## डॉ.पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ,अकोला.

---

## कंत्राटी कामगार रोजंदारी दर निश्चित निविदा

कामाचे नाव **कृषि तंत्र विद्यालय,बुलडाणा** येथे कुशल आणि अकुशल कंत्राटी पद्धतीने कामे करण्याकरिता एकुण ६ महिने कालावधी करिता कंत्राटी मजुर पुरविणे.

निविदाधारकाचे नाव:-............................................

# अनुक्रमणिका

कामाचे नाव **कृषि तंत्र विद्यालय,बुलढाणा** येथे कुशल आणि अकुशल कंत्राटी पद्धतीने कामे करण्याकरिता एकुण ६ महिने कालावधीकरिता कंत्राटी मजुर पुरविणे.



| अ.क्र. | तपशील | पान क्रमांक | |
|---|---|---|---|
| | | पासुन | पर्यंत |
| १ | ई –निविदा सुचना | | |
| २ | सविस्तर निविदा सुचना | | |
| ३ | चेक लिस्ट | | |
| ४ | कामाचे विवरणपत्रक | | |
| ५ | ई – निविदा पत्रकाविषयी नियम अटी व शर्ती | | |
| ६ | Declaration of the e-tender | | |
| ७ | Commercial Bid-A (Proforma for submission of e-tender rates) | | |



Signature of the Contractor with seal
Date:

CamScanner

# डॉ.पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ,अकोला.

## ई - निविदा सुचना

डॉ.पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ,अकोला अंतर्गत **कृषि तंत्र विद्यालय,बुलढाणा** येथील विविध विभागातील कुशल,अकुशल कंत्राटी मजुरांची कामे कंत्राटी पद्धतीने एकून **६ महिने** कालावधी करिता करून घेण्यासाठी ई–निविदेतील अटी व शर्तीचे अधीन राहुन मान्यताप्राप्त परवाना धारक व कामगार आयुक्त,महाराष्ट्र शासन यांच्या परवाना असलेल्या कंत्राटी मजुर ठेकेदाराकडून ई –निविदा मागविण्यात येत आहे.कामाची अंदाजित रक्कम रुपये **९०००००**/-जी.एस.टी.सह (लागू असल्यास)आहे.सदर निविदेचा सविस्तर तपशील दिनांक ०६/१०/२०२३ पासुन www.pdkv.ac.in या वेब पोर्टलवर उपलब्ध करून देण्यात आलेला आहे.

सदर ऑनलाईन ई-निविदा भरणेचा कालवधी दिनांक ०६/१०/२०२३ ते १६/१०/२०२३ पर्यंत राहील.

जा.क्र.कृ.तं.वि./बुलडाणा/ निविदा/275/ २०२३
दि. ०६/१०/ २०२३

स्वाक्षरी
प्राचार्य,
कृषि तंत्र विद्यालय, बुलढाणा

# डॉ.पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ,अकोला.

## ई-निविदा सुचना

डॉ.पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ,अकोला अंतर्गत **कृषि तंत्र विद्यालय,बुलढाणा** येथील विविध विभागातील कुशल,अकुशल कंत्राटी मजुरांची कामे कंत्राटी पद्धतीने एकून ६ महिने कालावधी करिता करून घेण्यासाठी ई–निविदेतील अटी व शर्तीचे अधीन राहुन मान्यताप्राप्त परवानाधारक व कामगार आयुक्त ,महाराष्ट्र शासन यांच्या परवाना असलेल्या कंत्राटी मजुर ठेकेदारांकडून सिलबंद ई–निविदा मागवित आहोत.त्याचा तपशील खालीलप्रमाणे

| अ. क्र. | कामाचे नाव | कामाची अंदाजित किंमत रु. | बयाना रक्कम रु. | कामाचा कालावधी | कोऱ्या निविदा पत्रकाची किंमत रु. | पात्रता वर्ग |
|---|---|---|---|---|---|---|
| | **कृषि तंत्र विद्यालय, बुलडाणा** येथे कुशल, अकुशल कंत्राटी पद्धतीने कामे करण्याकरिता एकूण ६ महिने प्रत्यक्ष प्रती महिना हजरदिवसानुसार कालावधी करिता कंत्राटी मजूर पुरविणे. | ९०००००/- | १५,०००/- | ६ महिने प्रत्यक्ष प्रति महिना हजर दिवसानुसार | ५०० | |

सदरील कामाची सविस्तर ई-निविदा सुचना,वेळापत्रक,अटी व शर्ती ई.सर्व माहिती www.pdkv.ac.in या पोर्टलवर प्रकाशित करण्यात आली आहे.

जा.क.कृ.तं.वि/बुलढाणा/निविदा/275/२०२३
दि.०६/१०/२०२३

स्वाक्षरी
प्राचार्य
कृषि तंत्र विद्यालय, बुलडाणा

CamScanner

Time table for e-Tendering

| Sr.no | Tendar stage and details | From date and time |
|---|---|---|
| 1 | Publish date | ------------- ----------- |
| 2 | Bid submission start date | ------------- ----------- |
| 3 | Bid submission last date | ------------- ----------- |
| 4 | Bid opening date | ------------- ----------- |

The interested and qualified contractors shall download e-tenders and to participate in e-tendering procedure,by using website portal www.pdkv.ac.in

The interested contractor shall have enrolment with above website and have digital signature Certificate.in this regard if there is any query, they may contact

**SIGNATURE**
**PRINCIPAL,**
**AGRI TECH SCHOOL BULDANA**

CamScanner

1. The interested contractors will have to submit all required documents i.e. copy of valid registration, PAN card etc.
2. The offer will be valid for 120 days from the date of opening the tender.
3. The tenderer should complete all the formalities within 10 (Ten) days from the date of acceptance of tender. If the tenderer fails, it will be considered that the tenderer is not interested and the next lowest tenderer shall be considered as the lowest tender. In this case, no representation shall be accepted after 10 days.
4. The other Terms and Conditions are available in tender form uploaded on above website.
5. The Authority reserves the right to reject any or all tendrs without assigning any reason and no explanation shall be offered for the rejection.
6. Tender can be rejected by the authority without assigning any reason and no explanation can be demanded for the rejection of the offer by the person/ firm submitting tender.
7. Presence of the contractor or his authorized representative is essential while tender opening otherwise their tender will not be opened. Representative should have the proper authority letter with him.
8. The date of opening of tender is tentative and subject to change, as per the availability of date and time of the competent authority.
9. Please take a note that the tender will be finalized on the basis of Service Charge (Contractual Commission) per day per unit.
10. If required, the authority shall call the tenderer for negotiations. In this case the decision of the authority shall be final.

**SIGNATURE**
**PRINCIPAL,**
**AGRI TECH SCHOOL BULDANA**

CamScanner

**ANNEXURE – D**

CHECK LIST / QUESTIONNAIRE

(To be kept in sealed envelope)
(To be filled by the Bidder only)

Any omission of the mandatory documents listed below will make the tender liable for rejection. You may attach other information as stated in the list and number the same pages.

| Sr. No. | Description | Whether attached | Page No. |
|---|---|---|---|
| 1 | Duly signed Declaration of the Bidder | Yes / No | |
| 2 | Contractual labour License. (Attach a copy) | Yes / No | |
| 3 | Employees State Insurance Corporation (ESIC) Registration.Attach a copy | Yes / No | |
| 4 | Professional Tax Registration ? (Attach a copy) | Yes / No | |
| 5 | Valid Registration Certificate under Shop and Establishment Act.( Attach a copy) | Yes / No | |
| 6 | PAN Card (Attach a copy) | Yes / No | |
| 7 | GST Registration Attach a copy) | Yes / No | |
| 8 | Upload a copy of undertaking that no case is pending with the police against the proprietor/ Firm/ Partner of the Company/ Agency | Yes / No | |
| 9 | Details of previous customers/ offices to whom the tenderer has provided the services.Contact number and address of the previous customer/ office to whom the tenderer has provided the services | Yes / No | |
| 10 | Copies of the certificates issued by the previous customer to the effect that the tenderer has provided the services to his office satisfactorily. (Attach copies) | Yes / No | |
| 11 | Duly signed terms & conditions along with form. | Yes / No | |
| 12 | Check list duly & signed as per ANNEXURE-D | Yes / No | |

Signature and seal of the Bidder

Full Name, designation & address Of the authorized person signing above for and on behalf of M/s..................................................................... (Name and address of the bidding form) with seal

CamScanner

# डॉ.पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ,अकोला.

## कामाचे विवरणपत्र

विषय:- **कृषि तंत्र विद्यालय,बुलडाणा** येथे कंत्राटी पद्धतीने कामे करणे करिता एकुण ६ महिने प्रत्यक्ष हजर दिवस प्रति महिना कालावधीकरिता कुशल आणि अकुशल मजुर पुरविणे.

**कृषि तंत्र विद्यालय,बुलडाणा** येथे कुशल,अकुशल मजुरांची कामे कंत्राटी पद्धतीने करून घेण्यासाठी ई-निविदेतील अटी व शर्तीचे अधीन राहुन परवानाधारक कंत्राटी मजुर ठेकेदारांकडून सिलबंद ई-निविदा मागवून एकुण ६ महिने कालावधीकरिता करून घ्यावयाची आहेत.त्याचा तपशील खालीलप्रमाणे.

| अ.क्र | कामाचा तपशील | |
|---|---|---|
| | **अकुशल कामगारांचे कामे** | |
| १ | गाय,म्हैस,बैल इत्यादी जनावरांची देखरेख (प्रक्षेत्रावर चारणे, चारा तयार करणे, चारा पाणी करणे रात्री व दिवसा,जनावरांची काळजी घेणे, गोठे साफसफाई.) | |
| २ | गाय/म्हैस सकाळ व सायंकाळ दुध काढणे. | |
| ३ | शेळी व मेंढी देखरेख (प्रक्षेत्रावर चारणे,चारा पाणी करणे, निवारा साफसफाई, करडांना दुध पाजणे व काळजी घेणे) | |
| ४ | कुक्कुटपालन देखरेख,दानापाणी करणे,अंडी गोळा करणे, राखण करणे, कुक्कुटपालन गृह साफसफाई, भांडे स्वच्छ करणे इ.) | |
| ५ | पिकातील विरळणी करणे. | |
| ६ | बियाणे टोकण करणे. | |
| ७ | पिकांना फळबागांना पाणी देणे. | दांड पद्धत. मोकाट पद्धत. |
| | | स्प्रिंकलर पद्धत.ठिबक पद्धत. |
| ८ | पिकांची कापणी,मळणी व गंजी लावणे. | |
| ९ | शेतातील धसकटे व काडीकचरा वेचणे. | |
| १० | पिके फळझाडे इ. संरक्षण करणे/ पहारेकरी. | |
| ११ | पिकातील डवरणी व वखरणी करणे. | |
| १२ | पाठीवरच्या पंपाने फवारणी करणे. | |
| १३ | फळबाग निगडीत दैनंदिन कामे. | |
| १४ | शेतीशी निगडीत दैनंदिन कामे. | |
| १५ | भांडार विभागातील कामे. | |
| १६ | उत्पादित मालाचे वजन करणे. | |
| १७ | उत्पादित माल दळणवळण करण्याकरिता मालाचे लोडिंग व अनलोडिंग करणे. | |
| १८ | बीज प्रक्रिया केंद्राची सर्व कामे (प्रक्रिया,टॅगींग,बॅगिंगसह) | |
| १९ | रात्रपाळी रखवालदार (सांय ४ ते रात्री १२ व रात्री १२ ते स.८) कार्यालय /प्रक्षेत्र. | |
| २० | थ्रेशर द्वारे मळणी करणे, पोते भरणे, वजन करणे, शिलाई मारणे व गोडाऊनला आणून थप्पी मारणे. | |

CamScanner

| | |
|---|---|
| २१ | बियाण्याची साफसफाई,प्रतवारी करून बॅग भरणे,शिलाई मारणे,वजन करणे व कमी दर्जाचे बियाण्याची थप्पी मारणे. |
| २२ | पिकातील निंदण करणे,पुंजे उचलणे,गवत कापणे. |
| २३ | रोपवाटिकेतील सर्व कामे. |
| २४ | कार्यालय साफ सफाई, |
| २५ | पाईपलाईनशी निगडीत सर्व कामे करणे. |
| २६ | बैलजोडी द्वारे वखरणी/पेरणी/डवरणी करणे. |
| २७ | शेणखत पसरवणे. |
| २८ | प्रयोगातील टोकन पद्धतीने पेरणी ( रासायनिक खत टाकणे व बि झाकणे |
| | ऐन वेळेवर आलेली शेतीशी निगडीत सर्व दैनंदिन कामे करणे. |
| | **कुशल कामगारांचे कामे** |
| १ | संगणकाशी संबधित कामे. ड्रायव्हर |
| | **स्वच्छक** |
| १ | कार्यालय मधील स्वच्छता गृहे स्वच्छ करणे, ड्रेनेज चेंबर व पाईपलाईन चोक अप काढणे व त्यानुषंगाने येणारे सर्व कामे करणे. |

स्वाक्षरी
प्राचार्य
**कृषि तंत्र विद्यालय, बुलडाणा**

CamScanner

# डॉ.पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ,अकोला.

---

## निविदा पत्रकाविषयी नियम,अटी व शती

१.ई-निविदा प्रक्रियेसाठी www.pdkv.ac.in या संकेतस्थळांवर नोंदणी करून कागदपत्रे डाउनलोड करून निविदा प्रक्रियेत सहभागी होता येईल.

२.निविदा पत्रकासंबंधीची सविस्तर माहिती **कृषि तंत्र विद्यालय,बुलडाणा** यांचे कार्यालयात विनामुल्य मिळेल.

३.निविदा पत्रकांची नियमानुसार किंमत व बयाना रक्कम ऑनलाईन प्रणालीव्दारे भरण्यात यावी.

४.निविदा सादर करतांना ऑनलाईन निविदा डाउनलोड करून ऑनलाईन प्रणालीद्वारे दर भरावे.

५.निविदा सादर कर्त्याने खालील कागदपत्रे स्वसाक्षांकित करून अपलोड करणे गरजेचेआहे.निविदा सादरकर्त्याने निविदा पत्रकात दिलेले दर स्पष्ट व स्वच्छ दिसतील या प्रमाणे भरुन सही व शिक्यासहीत स्कॅन करून वित्तीय लिफाफ्यात अपलोड करावे.

१.कंत्राटी मजूर पुरविण्याचा अद्ययावत परवान्याची सत्यप्रत.

२.कंत्राटदाराच्या आस्थापनेचे (कंपनी / संस्था) पॅन / टॅन कार्ड व निवीदेवर स्वाक्षरी करणा-याचे आधार कार्डची छायांकित सत्यप्रत.

३.कमीत कमी मागील तीन वित्तीय वर्षाचा विद्यापिठात अथवा शासकीय / निमशासकीय कार्यालय/ संस्था यांना कंत्राटी मजूर पुरविल्याचे अनुभव प्रमाणपत्राची सत्यप्रत.तसेच संबंधीत कार्यालयात काम समाधानकारक पूर्ण केल्याच्या प्रमाणपत्राची छायांकीत प्रत.कार्यालयाच्या कार्यालय प्रमुख / संबंधीत व्यक्तीचे पूर्ण नांव व संपर्क क्रमांक.

४.निविदा सादरकर्त्याने कोणत्याही शासकीय / निमशासकीय महामंडळाच्या काळ्या यादीत नांव समाविष्ट नसल्याचे स्वयंघोषीत प्रमाणपत्र सादर करावे.

५.भविष्य निर्वाह निधी (EPF) नोंदणी प्रमाणपत्राची सत्यप्रत.

६.व्यवसाय कर नोंदणी प्रमाणपत्राची सत्यप्रत.

७.ई. एस. आय.एस. (Employees State Insurance Scheme) नोंदणी प्रमाणपत्राची सत्यप्रत.

८.जी.एस.टी. नोंदणी प्रमाणपत्राची सत्यप्रत.

९.निविदा समितीने निश्चित केलेल्या नियम व अटी मान्य असल्याचे प्रमाणत्र निविदा धारकाने सादर करावे.

१०.मागील तीन आर्थिक वर्षात (म्हणजेच सन २०१९-२० ते २०२१-२२) आयकर भरलेल्या विवरण पत्राची सत्यपत्र.

११.निविदा प्रणाली भरण्यात आलेल्या बयाणा रक्कमेची पावती जोडावी.

१२.कंत्राटदाराने कंत्राटी मजुराचे मासिक दर नमुद करतांना Commercial Bid मध्ये Basic Wages+ Variable Dearness Allowance यांच्या एकूण रक्कमेवर त्याला आकारावयाच्या त्याच्या Service Charges (कमीशन) ची गणना करणे अपेक्षित आहे. निविदेची तुलना Commercial Bid मध्ये नमूद करण्यात आलेल्या अ.क्र. ९ च्या रक्कमेवर करण्यात येईल.सारखे दर आल्यास संबंधीतांना वाटाघाटीकरीता बोलविण्यात येईल व अनुभव, त्यांच्या आस्थापनेचे वार्षिक उलाढाल इ. बाबी विचारात घेऊन अंतिम निर्णय संबंधीत निवीदा समिती घेईल.

६.निविदा पत्रकाची किंमत,बयाणा रकमेवर कोणत्याही प्रकारचे व्याज किंवा विलंब आकार दिले जाणार

CamScanner

नाही.

७.निविदा सादरकर्त्याने निविदा पत्रकात दिलेले दर स्पष्ट व सुवाच्च दिसतील याप्रमाणे अंकी व अक्षरी भरून सही व शिक्क्यासहीत स्कॅन करून अपलोड करावे.

८.खाडातोड असलेली,पांढरी शाई लावलेली अथवा इतर कोणत्याही कारणास्तव निविदा खराब झालेली असल्यास तिचा विचार केला जाणार नाही.

१.दरपत्रकात दर भरून स्कॅन कॉपी अपलोड करणे.

२.ऑनलाईन प्रणालीव्दारे दर नमुद करावेत.

९. निविदा उघडण्याची वेळापत्रकात दिलेली वेळ व दिनांकामध्ये बदल होऊ शकतो.

१०.निविदा सादरकर्त्याची निविदा नामंजुर झाल्यास त्याची बयाणा रक्कम प्रक्रिया पूर्ण करुन परत करण्यात येईल. सदर रक्कमेवर कोणतेही व्याज दिले जाणार नाही.

११.कंत्राटदाराने कंत्राटी कामगाराचे वेतन रोखीने अदा न करता Account Payee CrossCheque द्वारे अदा करणे किंवा बँकेत खाते उघडून त्यांचे मासिक वेतन त्यांचे बँक खात्यात महिन्याच्या पाच तारखेच्या आत जमा करणे बंधनकारक राहील.

१२.कंत्राटदाराने करारनामा लिहून दिल्यानंतर मागणी केल्यानुसार कंत्राटी मजुर पुरविणे बंधनकारक राहील.तसे करण्यास ठेकेदार असमर्थ ठरल्यास नोंदणी रद्द करण्यास कामगार आयुक्त यांचेकडे शिफारस करण्यात येईल व सुरक्षा अनामत रक्कम जप्त करण्यात येईल व त्याचे नाव काळ्या यादीत समावेश करून त्यानंतर महाविद्यालयाच्या तसेच कोणत्याही विद्यापिठाच्या निविदा प्रक्रियेत संबंधित ठेकेदारास भाग घेता येणार नाही.

१३.कंत्राटदाराने निविदेत कंत्राटी कामगाराला देय असलेले किमान वेतन व कामगार कायद्यातील इतर तरतुदी पेक्षा कमी रक्कम नमुद करू नये.थोडक्यात कृषि विद्यापीठ यांच्यासाठी निर्धारित केलेले किमान वेतन कायद्यानुसार कंत्राटी कामगारास वेतन देणे बंधनकारक राहील.

१४.ज्या कंत्राटी मजुरांचा भविष्य निर्वाह निधी खाते क्रमांक (UAN) कार्यान्वित नसेल,त्यांना कामावर घेण्यात येवू नये तसेच नवीन कंत्राटी मजुर कामावर घ्यावयाचे असल्यास प्रथम त्याचे भविष्य निर्वाह निधी खाते क्रमांक (UAN) कार्यान्वित करून कामावर घेणे बंधनकारक राहील.

१५.बाल मजुर कायद्याचे पालन करणे कंत्राटदारास बंधनकारक राहील.

१६.कंत्राटदाराने नेमलेल्या कामगाराचा पगार,रजा,ग्रॅज्युएटी,बोनस,विमा योजना,पि.एफ.,ई.एस.आय.सी. इत्यादी देयक बाबी तसेच वेळोवेळी शासनाच्या निर्देशानुसार देय/वेतन देण्याची सर्व जबाबदारी कंत्राटदाराची राहील.या बाबतीत काही तंटा निर्माण झाल्यास **कृषि तंत्र विद्यालय,बुलढाणा** हे हस्तक्षेप करणार नाही.अथवा कोणतीही जबाबदारी या कार्यालयाची / विद्यापिठाची राहणार नाही.

१७. कंत्राटदाराने कामगारास दर महा अदा केलेल्या भविष्यनिर्वाह निधी,गट विमा पावती व वेतन चिठ्ठी दरमाह संबंधित कार्यालयास देणे बंधनकारक राहील.तसे न केल्यास त्याचे पुढील महिन्याचे देयक अदा करण्यात येणार नाही.

१८.कंत्राटदाराने महाराष्ट्र शासनाच्या कंत्राटी कामगार किमान वेतन कायद्यानुसार आवश्यक ते सर्व अभिलेख उदा.हजेरी नोंद,वेतन वाटप नोंद.दैनंदिन कामाच्या नोंदी इत्यादी नोंद वह्या ठेवणे व ते संबंधित अधिकाऱ्याकडून तपासून घेणे बंधनकारक राहील व त्याची जबाबदारी संबंधित कंत्राटदाराची राहील.

१९. कार्यालयाचे कामकाज सुट्टीच्या दिवशीही चालत असल्याने वेळोवेळी कंत्राटी मजुरांना सुट्टी देणे,कमी जास्त प्रमाणात कंत्राटी मजुर पुरवठा करणे व प्रत्येक कंत्राटी मजुरांना साप्ताहिक सुटी देणे बंधनकारक राहील.

२०. शासकीय विमा निधी व कामगार कायद्यानुसार शासनाने वेळोवेळी ठरवुन दिलेल्या नियमांची पूर्तता करणे कंत्राटदारास बंधनकारक राहील.यासंबंधीची कुठलीही जबाबदारी कार्यालयाची राहणार नाही.

CamScanner

२१. प्रत्येक कंत्राटी मजुरांना Contract Act मधील नमुण्याप्रमाणे ओळखपत्र देणे कंत्राटदारास बंधनकारक असुन कामाच्या दिवशी सदरील ओळखपत्र कामगाराकडे असणे गरजेचे आहे.

२२.कंत्राटी मजुरास काम करतेवेळी इजा,अपघात अथवा मृत्यु संभविल्यास किंवा नैसर्गिक आपत्ती उदा.वीज,पाऊस,भूकंप,मशिनरी अपघात, प्राणी / साप आणि वादळामुळे इजा अपघात मृत्यु संभविल्यास त्याची सर्व भरपाई व इतर कायदेशीर जबाबदारी कंत्राटदाराची राहील याचा कृषि तंत्र विद्यालय,बुलढाणा या कार्यालयाशी कसल्याही प्रकारचा संबंध राहणार नाही.

२३.कंत्राटी पद्धतीने मजूर पुरवठा करण्याचे काम सबकॉन्ट्रॅक्टर/कंपनी किंवा इतर व्यक्तींना देता येणार नाही.तसे निदर्शनास आल्यास संबंधितांचा करार रद्द करण्यात येईल व सुरक्षा अनामत रक्कम जप्त करण्यात येईल व त्यानंतर कार्यालयाच्या तसेच कोणत्याही विद्यापीठाच्या निविदा प्रक्रियेत संबंधित ठेकेदारास भाग घेता येणार नाही.उपरोक्त कारणामुळे काही कायदेशीर बाबी उत्पन्न झाल्यास त्याचा विद्यापीठाशी काहीही संबंध राहणार नसून त्याची जबाबदारी संबंधित कंत्राटदारावर राहील.

२४.कंत्राटदारास सेवा पुरविताना कार्यालयास एक संपर्क अधिकारी असणे अनिवार्य राहील.जो कार्यालयाच्या दैनंदिन कामकाजात कंत्राटी मजुरांबाबत येणाऱ्या अडचणीचा तात्काळ निपटारा करेल.

२५. पुरविण्यात येणाऱ्या कुशल व अकुशल कंत्राटी मजुरांचा ई.एस.आय.सी.कंत्राटदाराने उतरविणे बंधनकारक राहील.याबाबतची संपुर्ण कायदेशीर जबाबदारी कंत्राटदाराची राहील.

२६.कामाकरिता नेमलेल्या कंत्राटी मजुरांचा नियमानुसार सामुहिक विमा कंत्राटदाराने उतरविणे बंधनकारक राहील.

२७.निविदा मंजुर झाल्यानंतर कंत्राटदाराने ठरवुन दिलेल्या कामाचा सर्व अटी व शर्तीचा नोटराईज्ड करारनामा रु.५००/- च्या स्टॅम्प पेपरवर त्वरित करून द्यावा लागेल.

२८. सुरक्षा अनामत रक्कम मंजुर कंत्राटाच्या रक्कमेच्या ३ टक्के प्रमाणे नियंत्रक डॉ.पं.दे.कृ.वि.,अकोला यांचे नावे असलेल्या धनादेशाद्वारे भरणा करणे आवश्य आहे.त्यानंतर कार्यारंभ आदेश देण्यात येईल.

२९.कंत्राटदाराने काम अर्धवट / समाधानकारक न केल्यास, उर्वरित काम कंत्राटदाराच्या सुरक्षा रक्कम जप्त करण्यात येईल.

३०. संबंधित कार्यालयाच्या सुचने नुसार काम मुदतीत पुर्ण करावे लागेल.

३१.कंत्राटी मजुराने काम समाधानकारक रित्या न केल्यास त्याला त्या दिवशी परत पाठविण्यात येईल व कंत्राटदारास त्या दिवसाचे त्या कंत्राटी मजुराचे देयक अदा करण्यात येणार नाही.

३२.कामात काचुराई व हलगर्जीपणामुळे कार्यालयाचे नुकसान झाल्यास,दंडासह भरपाई करावी लागेल.

३३.निविदा उघडल्यानंतर किमान वेतनापेक्षा जास्त मात्र तुलनेत लघुत्तम दर सादर कर्त्यांशी दराबाबत वाटाघाटीचे अधिकार निविदा समितीस राहतील.

३४.कोणतीही निविदा पूर्णपणे किंवा अंशतःस्विकारणे किंवा आलेल्या सर्व निविदा नाकारण तसेच कोणतेही कारण न देता रद्द करण्याचा अधिकार निविदा समितीने राखुन ठेवला आहे.

३५.कार्यालयाकडून विलंबाने देयक जमा झाले तरी प्रत्येक महिन्याचे वेतन पाच तारखेपर्यंत संबंधित कंत्राटी मजुरांना अदा करणे कंत्राटदारास बंधनकारक राहील.किमान वेतन कायद्यानुसार अदा केल्याची माहिती ई.एस.आय.सी.,पि.एफ, कामगार कल्याण निधी यांची कामगारांना व त्यांचे योग्य त्या शासकीय खात्याला जमा केल्याची नोंद व चलने प्रत्येक महिन्याच्या देयकासोबत सादर करणे बंधनकारक राहील.

३६.कंत्राटदाराने कामावर ठेवलेल्या मजुरांची हजेरी पत्रक कामाच्या प्रत्येक ठिकाणी ठेवणे आवश्यक आहे.तसेच संबंधित विभागप्रमुख यांना केंव्हाही हजेरीपत्रक तपासण्याचा अधिकार राहील.वतपासणीमध्ये कंत्राटी मजुर कामावर न आढळल्यास गैरहजेरी मांडण्यात येईल.

३७. किमान वेतन व वेतन प्रदान अधिनियमातील विहित दरानुसार विहित वेळी ठेकेदाराने कंत्राटी मजुरांना

CamScanner

वेतन द्यावे. काही तांत्रिक कारणामुळे कार्यालयाकडून वेतन देण्यास वेतन देण्यास उशीर झाल्यास ठेकेदाराने ठरलेल्या वेळेत कामगारांना वेतन देणे बंधनकारक आहे.

३८. कंत्राटदार यांच्याकडून वरीलपैकी कोणत्याही अटी शर्तीचा भंग झाल्यास अथवा कंत्राटी मजुरांचे काम समाधानकारक नसल्याचे आढळून आल्यास सदरचा ठेका तातडीने रद्द करून विद्यापीठाकडे जमा केलेली अनामत रक्कम जप्त करण्याचा अधिकार विद्यापीठाचा राहील.

३९. किमान वेतन व कामगार अधिनियमातील तरतुदीनुसार येणारे उत्तरदायित्व विचारात घेऊन विद्यापीठ परिपत्रक किमान वेतन दराचे अभिप्राय घेऊन निविदेचे दर ठरविले जातात तसेच ठेक्यापोटी निम्यात येणाऱ्या कामगारांना किमान किमान वेतन दराने देय रक्कम देणे बंधनकारक असल्याने, प्राप्त झालेल्या दरापेक्षा कमी येणारे निविदा दर केवळ सर्वात कमी दराचे आहे.म्हणून स्वीकारले जाणार नाही.याची नोंद कंत्राटदाराने घ्यावी.

४०.आवश्यकतेनुसार कंत्राटी मजूर पुरविणे कंत्राटदारास बंधनकारक राहील. कामावर एखाद्या मजुराचे काम कार्यालयात असमाधानकारक वाटल्यास त्याच्या जागी तात्काळ दुसरा कंत्राटी मजूर बदलून द्यावा लागेल.

४१. इच्छुक निविदा सादर कर्त्यांनी आपले दरपत्रक सादर करताना वेळोवेळी निर्गमित होणारे शासकीय कार्यालय विद्यापीठ यांच्या आदेश /अधिसूचना परिपत्रकाची काटेकोरपणे पालन करणे तसेच मूळ किमान वेतन,राहणीमान भत्ता, भविष्य निर्वाह निधी व आवश्यक शासकीय सर्व कर समाविष्ट करून दर पत्रक सादर करणे निविदा सादरकर्त्यास बंधनकारक राहील.

४२.कामाचा कालावधी आदेश दिल्यापासून एकूण ६ महिने कालावधी करिता राहील. तथापि कार्यालय सदर कंत्राट मुदतपूर्व रद्द करण्याचा अधिकार राखून ठेवत आहे. तसेच आवश्यकतेनुसार एका वेळी एक महिना असे जास्तीत जास्त तीन वेळा सहमतीने कंत्राटाचा कालावधी वाढवता येईल.

४३.शासकीय नियमानुसार देय होणारे शासकीय कर संबंधित निविदाधारकाने भरणे बंधनकारक राहील निविदेमधील दर सर्व कर समाविष्ट करून द्यावेत.

४४.कराराचे संदर्भात कोणताही वाद निर्माण झाल्यास त्या संदर्भात अंतिम निर्णय विद्यापीठाचा राहील.

४५. कामाचा आदेश मिळाल्यानंतर काम करण्यास असमर्थ ठरल्यास अनामत रक्कम जप्त करण्यात येईल व दुसऱ्या क्रमांकाच्या लघुत्तम निविदा धारकास प्रथम क्रमांकाच्या निविदा धारकाने नमूद केलेल्या दरात काम करावयाची समर्थता दर्शविल्यास त्यांना काम देण्याचे हक्क निविदा समितीस राहतील.तसेच दुसऱ्या क्रमांकाच्या निविदा धारकाने असमर्थता दर्शविल्यास तिसऱ्या क्रमांकाच्या लघुत्तम निविदाधारकाने प्रथम क्रमांकाच्या निविद्याधारकाच्या दरात काम करण्याची समर्थता दर्शविल्यास यांना काम देण्याचे हक्क निविदा समितीस राहतील.

४६. उपरोक्त अटी व शर्तीचे काटेकोरपणे पालन करणारे ठेकेदार निविदा प्रक्रियामध्ये भाग घेण्यास अधिकृत ठरतील.

४७. कंत्राटदाराने नियम व अटी काळजीपूर्वक वाचून या अटी व शर्ती मान्य असल्याचे प्रपत्र निविदा सादर कर्त्यास निविदा सादर करतेवेळी जोडणे बंधनकारक राहील.

४८.या निविदेबाबत / प्रक्रियेबाबत कुठलेही न्यायालयीन प्रकरण उद्भवल्यास अधिकार क्षेत्र बुलढाणा जिल्हा न्यायालय हे राहील.

स्वाक्षरी
प्राचार्य
कृषि तंत्र विद्यालय,बुलडाणा

CamScanner

## Declaration of the E-Tender

That........I/we.......am/are authorized nominee (s)/ authorized signatory of the firm........hereby submit the e-tender to................for the supply of Services. That I/We have read the general And specific Terms and Conditions as mentioned in this e-tender form (E-tender Notice No......Carefully and that I/We accept all the terms and conditions mentioned in the tender document and solemnly affirm that I/ We shall abide by the same.)

1. That I/We are well acquainted with the facts about the firm and the information provided in the e-tender form is true and correct.
2. I/We may be punished as per law for any wrong / false information, misleading facts provided in the e-tender form besides rejection of my /our e-tender.
3. I/We agree that in case of any disputes the jurisdiction will be......... .....District Court only.
4. I/We are bound to supply service to........... at given location, on the same terms and conditions and at the same rates as approved in the rates contract for further three months, if given extension.
5. I/We solemnly declare that all the terms and conditions are acceptable to me and binding on me. each page of e tender form is duly signed by me in acceptance.

Place:

Date: Name and Signature of E-Tenderer

(Seal)

CamScanner

## COMMERCIAL BID-A

Name of the work :- Supply of contractual skilled and unskilled labour for the works detailed in the tender period six month at Krishi Tantr Vidyalay,Buldhana.

### PROFORMA FOR SUBMISSION OF E-TENDER RATES (COMMERCIAL BID)

| Sr. No | Description | Skilled contractual labour (Rs.)# | Unskilled contractual labour (Rs.)# | Sweeper (Rs.)# |
|---|---|---|---|---|
| 1 | Basic Wages | | | |
| 2 | Variable Dearness Allowance | | | |
| | **Total Minimum Wages** | | | |
| 3 | EPF 13% | | | |
| 4 | ESIS 4% | | | |
| 5 | Service Charges for Company / Firm Charges* | | | |
| 6 | Total Rs. | | | |
| 7 | GST 18% (If applicable) | | | |
| 8 | Total with GST | | | |
| 9 | Rate per month per unit for skilled / unskilled / sweeper (Rs.) 1 Unit ** | | | |

# Rates mentioned here are applicable for zone Buldhana city as per prevailing Minimum Wages Act. It is mandatory upon the tenderer to pay the wages as per the Act to the Contractual Labour.

*These should be mentioned in percentage and calculated on the total amount of Basic Wages + Variable Dearness Allowance i.e Total Minimum Wages.

** Financial Bid shall be compared on the amount mentioned in this row. These rates should be mentioned in the commercial bid.

Place:

Date:

Name and Signature of E-Tenderer

(Seal)

CamScanner

**Dr.Panjabrao Deshmukh Krishi Vidhyapith,Akola**

---

## COMMERCIAL BID

Name of the work:-Supply of contractual skilled and unskilled labour for the works detailed in the tender period six month at........................

Name of the Agency:-........................................................................
Address:-..........................................................................................

| Sr.No. | Particulars of item / work | Number of Contractual labour per day | Rate per contractual labour per month in rupees as mentioned in bid- A at Sr. no. 9 ( in numbers & words ) |
|---|---|---|---|
| 1 | Supply of contractual Unskilled contractual labours | 1 Unit | |
| 2 | Supply of contractual Skilled contractual labours | 1 Unit | |
| 3 | Supply of contractual Sweeper | 1 Unit | |

Note : The rate for one unit to be quoted by contractual labour contractor shall be inclusive off all taxes and other allowance and should be in compliance of minimum wages act.

Place:
Date:

Name and Signature of E-Tenderer
(Seal)

CamScanner